दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक २४१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२६ नोव्हेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## बंद दुकानातील घरफोडीत लाखोचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील एका बंद दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपयाचा ऐवज चोरुन नेल्याने व्यापारी वर्गामध्ये भितीयुक्त वातावरण आहे.

मोहम्मद शहीद यांचे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पोलीस चौकीजवळ फर्स्ट चॉईस नावाचे होलसेल आणि रिटेलचे कपड्याचे व इतर साहित्याचे दुकान आहे. त्यांनी गल्ल्यामध्ये जवळपास २ लाखाची रोख रक्कम ठेवली होती व दुकान बंद करून ते घरी गेले होते.

सकाळच्या वेळेस ते घरी आले असता त्यांच्या दुकानाचे शटर उचकटल्याचे आढळले. आत प्रवेश करून अधिक तपास केला असता त्यांच्या गल्ल्यामध्ये ठेवलेले जवळपास २ लाखापेक्षा जास्त रोख रक्कम अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याचे समजले. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# १ डिसेंबरपासून पहिलीपासूनचे वर्ग सुरु होणार ; मंत्रिमंडळाचा निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोनाच्या फैलावामुळे गेल्या दीड वर्षापासून बंद असलेल्या राज्यातील शाळांची घंटा अखेर वाजणार आहे. येत्या १ डिसेंबरपासून राज्यातील पहिलीपासूनचे शाळांचे वर्ग सुरू होणार आहेत. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आतापर्यंत ऑनलाईन भरणारे राज्यातील शाळांचे पहिलीपासूनचे वर्ग आता प्रत्यक्ष मुलांच्या उपस्थितीने गजबजणार आहेत.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील कोरोनाचा फैलाव खूप कमी झाला आहे. ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातही कोरोनाची रुग्णसंख्या आटोक्यात आली आहे. अशा परिस्थितीत राज्यातील शाळांचे पहिलीपासूनचे वर्ग सुरू करण्यासाठी ही वेळ अनुकूल असल्याचा अंदाज घेऊन राज्य सरकारने १ डिसेंबरपासून राज्यातील शाळांचे पहिलीपासूनचे वर्ग सुरू



करण्याचा निर्णय राज्य सरकारने आझ झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला आहे.

दरम्यान, राज्यातील माध्यमिक शाळांचे वर्ग काही दिवसांपूर्वी सुरू झाले होते. त्यानुसार आठवी ते दहावी तसेच ११ वी १२ वीचे वर्ग सुरू झाले होते. मात्र लहान मुलांच्या आरोग्याचा विचार करून पहिली ते सातवीचे वर्ग अद्यापही सुरू झाले नव्हते. मात्र आता हे वर्ग सुरू होणार आहेत.


गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाच्या संसर्गामुळे राज्यातील शाळांचे बहुतांश वर्ग बंद होते. मात्र आता राज्यातील पहिली ते बारावीपर्यंतचे सर्व वर्ग सुरू होणार आहेत, शाळेमध्ये सुरक्षित आणि आरोग्यमय वातावरण देण्याचा आमचा प्रयत्न असेल.

तसेच शाळा सुरू झाल्यावर घ्यावयाची खबरदारी आणि नियमावलीबाबत आम्ही येत्या आठ दिवसांमध्ये निर्णय घेणार आहोत, अशी माहिती राज्याच्या शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली आहे.

## मुंबई विधान परिषदेची निवडणूक बिनविरोध होणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

अपक्ष उमेदवार सुरेश कोपरकर यांनी आ-पला उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आता मुंबईतील विधान परिषदेच्या दोन जागा बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अपक्ष उमेदवार कोपरकर यांना काँग्रेसने पाठिंबा दिला होता.



कोपरकरांच्या माघारीनंतर आता भाजपचे उमेदवा राजहंस सिंह आणि शिवसेनेचे उमेदवार सुनील शिंदे यांची निवड आता बिनविरोध होऊ शकणार आहे.

विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसचे सुरेश कोपरकर यांनी अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या अर्जामुळे कोपरकर, सिंह आणि शिंदे अशी ही तिरंगी लढत होणार होती. कोपरकर यांच्या उमेदवारीचा फटका शिवसेनेचे उमेदवार शिंदे यांना बसेल असे बोलले जात होते. आता कोपरकर यांच्या माघारीमुळे शिंदेचा मार्ग मोकळा झाला आहे.

भाजपचे उमेदवार राजहंस सिंह हे पूर्वी काँग्रेस पक्षात होते. सिंह यांनी नगरसेवक ते आमदार असा प्रवास केला आहे. काँग्रेसला सोडचिठ्ठी देत ते भाजपत दाखल झाल्यानंतर झालेल्या विधान सभेच्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. राजनाथ सिंह हे भाजपचा एक उत्तर भारतीय चेहरा असून त्यांच्या माध्यमातून उत्तर भारतीयांना भाजपकडे वळवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. त्यांच्या विजयाने भाजपचा हा उद्देशही साध्य होणार आहे. तर शिवसेनेकडून उमेदवारी देण्यात आलेले सुनील शिंदे हे शिवसेनेचे माजी आमदार आहेत. राजनाथ सिंह यांच्या प्रमाणेच शिंदे हे देखील मुंबई महानगरपालिरकेचे नगरसेवक होते. तसेच ते बेस्ट समितीचे अध्यक्षही होते. राज्यातील विधान परिषदेच्या सहा जागांसाठी निवडणूक होत असून या सर्व जागांची निवड बिनविरोध व्हावी यासाठी महाविकास आघाडीबरोबरच भाजपचाही प्रयत्न आहे. मात्र मुंबईपुरतं बोलायचं झाल्यास कोपरकर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर आता शिंदे आणि सिंह यांचा विधान परिषदेत जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## केंद्रीय वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री, निर्मला सीतारामन यांची जेएनपीटी बंदराला भेट

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदरात केंद्रीय वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सितारामन यांनी बंदराच्या कामकाजाविषयी आणि सीमाशुल्क सुविधांच्या श्रेणीबद्दल सर्वसमावेशक माहिती मिळविण्यासाठी, भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्टला भेट दिली. व्यापार आणि वाणिज्य गतिमान करण्यासाठी बंदराने ऑफर केले.

बंदरावर आगमन झाल्यावर,जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी, आणि उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, यांनी केंद्रीय मंत्री यांचे स्वागत केले, जेथे त्यांना जेएनपीटी येथे तैनात असलेल्या सीआयएसएफ जवानांनी गार्ड ऑफ ऑनर प्रदान केले. बंदरातील त्यांच्या दिवसभराच्या भेटीदरम्यान, केंद्रीय मंत्री यांनी जेएनपीटीच्या अत्याधुनिक सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझाला भेट दिली आणि सीपीपीमध्ये फॅक्टरी सीलबंद निर्यात कंटेनरसाठी सीमाशुल्क परीक्षा सुविधा




उभारण्याच्या पायाभरणीचे उद्घाटन केले.

याशिवाय, केंद्रीय मंत्र्यांनी जेएनपीटी गॅझेबो व्ह्यू-पॉइंटवरून सर्व टर्मिनल्स आणि आसपासच्या पायाभूत सुविधांचा टॉप-अँगल व्ह्यू घेतला. आदल्या दिवशी, केंद्रीय मंत्र्यांनी समुद्राच्या बाजूने सर्व बंदर टर्मिनल्सचे लेआउट आणि पायाभूत सुविधांचे मूल्यमापन केले, जिथे त्यांना व्यापार आणि वाणिज्य गतिमान करण्याच्या उद्देशाने जेएनपीटीच्या अनेक उपक्रमांची माहिती देण्यात आली आणि सागरी समुदायाला आणखी सुविधा प्रदान करण्यात आली.

## संक्षिप्त...

### परमबीर सिंग यांची ७ तास चौकशी; आरोप फेटाळले



**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर १०० कोटी रुपयांच्या वसुलीचा गंभीर आरोप केलेले आणि फरार घोषित करण्यात आलेले मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग आज अखेर मुंबईत दाखल झाले. गोरेगाव येथे दाखल करण्यात आलेल्या खंडणी वसुली प्रकरणाच्या तपासासंदर्भात तपास यंत्रणांना सहकार्य करण्यासाठी परमबीर सिंग आज थेट कांदिवलीमधील गुन्हे शाखेच्या कक्ष ११ मध्ये हजर झाले. तब्बल सात तासांच्या चौकशीनंतर सिंग कक्ष ११ मधून बाहेर पडले.

परमबीर सिंग चंदीगडमध्ये असल्याची माहिती बुधवारी मिळाली होती. आपण देशातच असून जी-वाला धोका असल्याचे सांगत सर्वो च्च न्यायालयाने अटकेपासून संरक्षण दिल्यास दोन दिवसांत चौकशीला हजर राहू, असे परमबीर यांनी कोर्टात वकिलामार्फत स्पष्ट केले होते. त्यानुसार कोर्टाने परमबीर सिंग यांना अटकेपासून संरक्षण देण्याचा निर्णय जाहीर केला होता.

कोर्टाच्या निर्णयानंतर परमबीर सिंग आज मुंबईत दाखल झाले आहेत. परमबीर यांच्याविरोधात मुंबई व ठाणे येथे सहा गुन्हे दाखल आहेत. आपल्याविरोधात मुंबईत सुरू असलेल्या सीबीआय चौकशीला सामोरे जाण्याची तयारी असल्याचे परमबीर सिंग यांनी यावेळी स्पष्ट केले आहे.

## हनुमान कोळीवाडा पुनर्वसित जागेची प्रशासनाकडून पाहणी

### १ डिसेंबर रोजी होणारे आंदोलन आता २६ फेब्रुवारीला

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली दि १७/११/२०२१ रोजी ठीक ४ वाजता हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ मंडळ व जिल्हाधिकारी यांच्यात झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी जेएनपीटीच्या जसखार येथील भराव केलेल्या जमिनीत शासनाने सन १९८५ शासन निर्णयाने शेवा (हनुमान) कोळीवाडा गावातील ८६ शेतकरी १७० बिगर शेतकरी असे एकूण २५६ कुटुंबांना भूखंड जमीन वाटपाचे आणि शासनाच्या मापदंडाने नागरी सुविधा देण्याचे कामाची जबाबदारी उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, उरणचे तह-सीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्यावर सोपविली होती.

त्या अनुषंगाने तहसीलदार भाऊसाहेब अंधारे,जे एन पी टी प्रशासनाचे अधिकारी राजेश फडके, न्हावा शेवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे आणि इतर अधिकारी यांनी कस्टम वसाहत जवळील जेएनपीटिच्या विकसित जमिनीत शासनाच्या माप दंडा नुसार ७१० गुंठ्यात २५६ भूखंड आणि शासनाच्या मापडंदा नुसार नागरी सुविधा देण्याचे मान्य व कबूल केले आहे. यावेळी सदर जमिनीची पाहणी शासकीय अधिकारी व हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी केली.

पुनर्वसनाचे काम करण्यासाठी .../२



## काँग्रेसच्या सुदाम पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाविकास आघाडीच्या माध्यमातून आम्ही एकत्रितपणे निवडणुका लढवणारच आहोत. राष्ट्रवादीत इतर पक्षातून अनेकजण पक्षप्रवेश करीत आहेत. त्यातच सुदाम पाटील यांच्या सारख्या अनुभवी कार्यकर्त्याचा राष्ट्रवादीत प्रवेश होताना अत्यानंद होत आहे. त्यांना राष्ट्रवादीत नक्कीच मानाचे स्थान मिळेल अशी ग्वाही देतो. त्याचप्रमाणे सुदाम पाटील यांच्यासह पनवेलमधील काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीत केलेला प्रवेश यामुळे पनवेल परिसरात पक्षाला अधिक बळकटी मिळेल व पक्ष संघटन मजबूत होईल, असा विश्वास राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त केला. ते मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश कार्यालयात पनवेलमधील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत केलेल्या प्रवेश कार्यक्रमादरम्यान बोलत होते.

यावेळी काँग्रेसच्या जिल्हा महिला उपाध्यक्ष शशिकला सिंह, जिल्हा कार्याध्यक्ष ताहीर पटेल, मजदूर सेल जिल्हाध्यक्ष अमित लोखंडे, सेवादल महिला जिल्हाध्यक्ष सुदेशना रायते,ट्रान्सपोर्ट सेल जिल्हा अध्यक्ष विनीत कांडपिळे, कळंबोली महिला ब्लॉक अध्यक्षा जयश्री खटकले, नरेश कुमारी मेहमी, वीर सिंग यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. जयंत पाटील पुढे बोलताना .../२

## केंद्रीय मंत्री कपिल पाटील शुक्रवारी मोहोपाड्यात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल हर घर जल' या मोहिमे अंतर्गत शुक्रवार दिनांक २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ०५ वाजता मोहोपाडा मैदानावर केंद्रीय पंचायत राज मंत्री कपिल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीतीत पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यास प्रमुख मान्यवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार देवेंद्र साटम, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, खालापूर तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे, उरण तालुका अध्यक्ष रवि भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शहा, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, उपस्थित राहणार आहेत. वासांबे, पुनाडे आठगाव पूर्व विभाग आणि चाणजे या परिसरातील गावांकरिता पाण्याची दीर्घकालीन पाणी योजना राबविण्याच्या दृष्टिकोनातून या पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

### महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ रायगड जिल्हा कार्यकारणी समिती जाहीर

## निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे यांची अध्यक्षपदी तर जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांची सरचिटणीसपदी निवड

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयातील राजपत्रित वर्ग १ व २ च्या अधिकाऱ्यांची ओळख तसेच महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघाच्या जिल्हा समन्वय समितीचे पुनर्गठन या संदर्भातील महत्वाची बैठक सोमवार, दि.२२ नोव्हेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार ग.दि.कुलथे यांच्या अध्यतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात संपन्न झाली.

या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांची अध्यक्षपदी तर जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांची सरचिटणीसपदी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी मुख्यालय सह सरचिटणीस सुदाम टाव्हरे, संघटक रमेश जंजाळ, बापूसाहेब सोनवणे तसेच विविध शासकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जाहीर करण्यात आलेली रायगड जिल्हा कार्यकारिणी समिती पुढीलप्रमाणे :- अध्यक्ष-



निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, सरचिटणीस- जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप. उपाध्यक्ष- जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे, उपायुक्त, पशुसंवर्धन डॉ.सुभाष म्हस्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग अलिबाग जगदीश सुखदेवे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद भगवान घाडगे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सूर्यवंशी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.महाड आर.के.बामणे, कामगार उपायुक्त प्रदीप पवार. कार्याध्यक्ष- उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) जि.प.रायगड निलेश घुले, सह कार्याध्यक्ष- जिल्हा खनिकर्म अधिकारी रोशन मेश्राम, कोषाध्यक्ष- डॉ.मनोजकुमार श्रेणिक शेट्ये, सह कोषाध्यक्ष- विकास बाबासाहेब खोळपे. सहसरचिटणीस-जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पेण शशिकांत तिरसे, .../२

# ‘आभासा’ची बांधबंदिस्ती

’आभासी चलनातील व्यवहारांचे नियंत्रण करावयाचे असेल, तर केंद्र सरकारने त्यासाठी स्वतंत्र कायदा करावा. आम्ही यात कोणताही निर्णायक अशा स्वरूपाचा आदेश देऊ शकत नाही,’ असे सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षांपूर्वीच केंद्र सरकारला बजावले होते. त्यानंतर आता केंद्र सरकारने आभासी चलनावर, म्हणजे ’क्रिप्टो करन्सी’वर बंदी आणण्यासाठी गंभीर हालचाली सुरू केल्या आहेत. संसदेच्या आगामी हिवाळी अधिवेशनात यासाठी विधेयक येईल. त्याचे कायद्यात रूपांतर होण्यात काही अडचणी येणार नाहीत. केंद्र सरकारने हे आधीच करायला हवे होते. नवा कायदाही आभासी चलनातील भारतीयांची गुंतवणूक कितपत रोखू शकेल आणि या व्यवहारांवर निर्बंध ठेवण्यात सरकारला यश येते का, हा पुढचा कळीचा प्रश्न आहे. केवळ कायद्याने याचे उत्तर मिळणार नाही. आभासी चलनांवर बंदी घालतानाच, रिझर्व्ह बँकेची अधिकृत डिजिटल करन्सी देशात उपलब्ध करावी, असे प्रयत्न सरकारने सुरू केले आहेत. या प्रयत्नांचे स्वागत करायला हवे. हिवाळी अधिवेशनात एकाच वेळी क्रिप्टो करन्सीवर निर्बंध आणि गुंतवणूकदारांना भारताच्या अधिकृत डिजिटल करन्सीचा पर्याय, अशा दोन्ही गोष्टी एकदम होतील, असे दिसते. याने आभासी चलनांचे सारे प्रश्न सुटतील असे नाही; किंबहुना आभासी चलनांना वेसण घालण्याच्या मोहिमेतील हे केवळ पहिले पाऊल मानून, केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेला पुढेही सातत्याने अनेक पातळ्यांवर प्रयत्न करावे लागतील. नवीन कायदा आल्यानंतर, केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या आभासी चलनांमध्ये व्यवहार करणे बेकायदा ठरेल. रिझर्व्ह बँकच नव्हे, तर केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आर्थिक गुन्हे नियंत्रणात ठेवणाऱ्या अनेक यंत्रणा यात लक्ष घालू शकतील. आज तसे करता येत नाही; मात्र आभासी चलनांमधील भारतीयांचे व्यवहार तपासणे किंवा त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे सोपे नाही. याचे कारण, बिटकॉइन; तसेच इतरही आभासी चलनांचे व्यवहार कमालीचे गुप्त असतात. या व्यवहारांच्या गुप्ततेचे सगळे टप्पे ओलांडत आभासी चलनातील भारतीयांची गुंतवणूक सिद्ध करणे, हे सोपे काम नाही. आजच भारता–तील हजारो गुंतवणूकदारांनी जगातील विविध आभासी चलनांमध्ये अब्जावधी डॉलरची गुंतवणूक केली आहे. अशी गुंतवणूक करणारे अनेक नामांकित; तसेच सेलिब्रेटी आहेत. उद्या ही सगळी गुंतवणूक अधिकृत माध्यमांमध्ये किंवा रिझर्व्ह बँकेच्या नव्या डिजिटल चलनाकडे वळवणे, हे सर्वच भारतीय यंत्रणांसमोरचे मोठे आव्हान आहे. बिटकॉइन किंवा इतर कोणतेही आभासी चलन हे कितपत सुरक्षित आहे आणि त्यातील गुंतवणूक ही कायम चढतच राहील, की अवचित कोलमडणाऱ्या शेअर बाजारांप्रमाणे तोट्यातही जाऊ शकते, हे कुणालाही माहीत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, या आभासी चलनांवर जगातल्या कोणत्याही देशाचे किंवा मध्यवर्ती बँकांचे नियंत्रण नाही. या चलनांचे सारे अस्तित्व केवळ ’डिजिटल’ असल्याने, त्यांना कोणत्याही देशाच्या सीमा माहीत नाहीत. त्या अडवूही शकत नाहीत. ’बिटकॉइन’ या पहिल्या आभासी चलनाची तर संपूर्ण जगात किती संख्या असेल, हेही ठरून गेले आहे. यामुळे, बिटकॉइनच्या प्रत्येक एककाचे मूल्य वाढत जाणे, इतका एकच पर्याय राहतो. हे भूमिती श्रेणीने वाढत जाणाऱ्या मूल्याचे गणित भविष्यात कधीही बिघडणारच नाही, याची ग्वाही कोणीही देऊ शकत नाही. आज जगभरात दीड हजारांहून अधिक आभासी चलनांचा सुळसुळाट झाला आहे. यातील किती विश्वासार्ह असतील? शेअर बाजार कसा गडगडू शकतो, याचा अनुभव भारतीय गुंतवणूकदार सध्या घेत आहेत, तरी भांडवली बाजारावर नियंत्रण ठेवणाऱ्या ’सेबी’सारख्या यंत्रणा अस्तित्वात आहेत. आभासी चलनांचे असे नियंत्रण ठेवणारी कोणती यंत्रणा आज जागतिक पातळीवर आहे? यामुळेच, एरवी अर्थकारणात अतिशय आक्रमक धोरण राबविणाऱ्या चीनने आभासी चलनांबाबत सावध भूमिका घेतली आहे. चीनचे स्वत:चे डिजिटल चलन आहे आणि इतर कोणत्याही आभासी चलनांना त्या देशात प्रवेश नाही. उद्या संसदेत नवा कायदा मंजूर झाल्यानंतर सरकारी अटी व नियम पाळणाऱ्या आभासी चलनांना देशात अनुमती मिळू शकेल. आज जशी काळ्या पैशातील किंवा परदेशी बँकांमधील गुंतवणूक बेकायदा आहे, तशीच आभासी चलनातील गुंतवणूक बेकायदा ठरेल. यात एक मुद्दा आभासी चलनात होणारी बेकायदा गुंतवणूक रोखणे, हा आहे. याहीपेक्षा अधिक महत्त्वाचा मुद्दा सर्वसामान्य भारतीय नागरिकांना या आभासी मोहजालापासून सुरक्षित आणि दूर ठेवण्याचा आहे. हे लक्ष्य साधणे सोपे नाही. निदान आज केंद्र सरकारने या ’आभासा’ची बांधबंदिस्ती सुरू केली आहे. एकेकाळी स्वीस बँकांमध्ये गुंतविलेला काळा पैसा शोधणे व परत आणणे हे जसे महाकाय आव्हान होते आणि आजही आहे; तसेच आव्हान नवा कायदा झाल्यानंतरही ’आभासी चलनां’च्या बाबतीत राहणार आहे, हे विसरून चालणार नाही.

# सुरेश लाड यांचे बंड शमले ; पुन्हा जिल्हाध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला

**दै.रायगड नगरी । कर्जत**

रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष पदाचे राजीनामा प्रदेश अध्यक्ष यांच्याकडे पाठवून देणारे माजी आमदार सुरेश लाड यांचे बंड तिसऱ्या दिवशी शमले आहे.आगामी काळात होऊ घातलेल्या नगरपंचायत,नगरपरिषदा आणि जिल्हा परिषद– पंचायत समित्यांच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस आपल्या परंपरागत मित्र पक्षांना सोबत घेऊन लढणार असून महाविकास आघाडी मधील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेसोबत युती करणार नाही?या अटीवर सुरेश लाड यांनी राष्ट्रवादीचे जिल्हा अध्यक्ष पदाचा पदभार पुन्हा स्वीकारत असल्याचे जाहीर केले.

२३ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश लाड यांनी आपल्या पदाचा राजीनामा पक्षाच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात पाठवून दिला होता. आज २५ नोव्हेंबर रोजी सुरेश लाड यांना सोबत घेऊन पनवेल येथे पोहचले.पनवेल येथील एका हॉटेल मध्ये सुनील तटकरे, सुरेश लाड यांच्यात बैठक झाली. त्यावेळी सुरेश लाड यांच्या सर्व बाबीं समजून घेत सुनील तटकरे यांनी आगामी काळात पक्षाच्या वरिष्ठ नेत्यानाकडून त्या त्या विषयांवर सकारात्मक चर्चा केली जाईल असे आश्वासन दिले. आगामी काळात रायगड जिल्हयात सहा नगरपंचायतच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानंतर जिल्ह्यातील दहा नगरपरिषद आणि रायगड जिल्हा परिषद तसेच १५ तालुका पंचायत समित्या यांच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या आहेत. ते लक्षात घेता निवडणुकीच्या तोंडावर जिल्हा अध्यक्ष बदलला जाणे हे पक्षाला आणि कार्यकर्त्यांची निवडणुका लढण्याची उमेद हरवून जाईल आणि म्हणून जिल्हा अध्यक्ष पदावर काम करावे अशी सूचना सुनील तटकरे यांच्यासह तेथे उपस्थित असलेले राष्ट्रवादी काँग्रेस चे कार्यकर्ते यांनी सुरेश लाड यांना केली. त्यावेळी जेष्ठ नेते हनुमंत पिंगळे,रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस तानाजी चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ धुळे, जिल्हा राष्ट्रवादी युवक चे अध्यक्ष अंकित साखरे, कर्जत तालुका अध्यक्ष भगवान चंचे, खालापुर तालुका अध्यक्ष नरेश पाटील, माजी तालुका अध्यक्ष एच के पाटील, विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष संतोष बैलमारे, तसेच शरद लाड, संदीप मुंढे, कैलाश घारे,संतोष थोरवे, आदी उपस्थित होते. सुरेश लाड यांची जिल्हा अध्यक्ष पदावर पुन्हा काम करण्याची मनधरणी करण्यात यशस्वी झाल्यानंतर रायगड जिल्ह्यातील आगामी सर्व निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हा अध्यक्ष सुरेश लाड यांच्या नेतृत्वाखाली लढणार असल्याचे जाहीर केले.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## हनुमान कोळीवाडा पुनर्वसित जागेची प्रशासनाकडून पाहणी

शासकीय अधिकाऱ्यांनी, प्रशासनाने वेळ मागितल्याने हनुमान कोळीवाडा मंदिरात हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ मंडळ, पुनर्वसन कमिटी यांची तातडीने बैठक झाली. या बैठकीत १/१२/२०२१ रोजी होणारे आंदोलन दि २६/२/२०२१ रोजी ठेवण्याचे एकमत झाले. तसे निर्णयही जाहीर करण्यात आला. त्यामुळे हनुमान कोळीवाड्याचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे. ३७ वर्षे लढा, संघर्ष केला असता आता कुठेतरी प्रशासनातर्फे हालचाल होऊ लागली आहे. मात्र हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांची जर शासनाने फसवणूक केली तर २६/२/२०२१ रोजी प्रशासना विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ग्रामसुधारणा मंडळ हनुमान कोळीवाडा, पुनर्वसन कमिटीने प्रशासनाला दिला आहे.

## काँग्रेसच्या सुदाम पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

म्हणाले की, पनवेलचे नागरीकरण झपाट्याने होत आहे. त्याच बरोबरीने नागरिकांचे विविध प्रश्नही प्रलंबित आहेत. जनतेने पनवेल महापालिकेत सत्ताधारी भाजपला एकहाती कौल दिला असला तरीही त्यांनी अद्यापही जनतेचे प्रश्न मार्गी लावले नाहीत, त्यामुळे जनतेचा भ्रमनिरास होत आहे. यासाठी आगामी महापालिका निवडणुकांमध्ये महाविकास आघाडीच्या माध्यमातून यश संपादन करून नागरिकांचे सर्व प्रश्न सोडवावेत अशा सूचनाही जयंत पाटील यांनी प्रवेशकर्त्यांना दिल्या. रायगडचे खासदार सुनील तटकरे हे अत्यंत प्रभावीपणे रायगडचे नेतृत्व करीत आहेत. त्यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावित होऊन रायगडमध्ये राष्ट्रवादीत पक्षप्रवेशाचा झंझावात वाढत आहे. सुदाम पाटील यांचा राष्ट्रवादीत योग्य सन्मान करण्यात येईल व त्यांच्या बरोबरीने प्रवेश केलेल्या सर्वांनाच मानाचे स्थान मिळेल. लवकरच सुदाम पाटील यांना प्रदेश कार्यकारिणीत पद देण्यात येणार असल्याचे आश्वासनही जयंत पाटील यांनी यावेळी दिले. खासदार सुनील तटकरे यावेळी बोलताना म्हणाले की, पनवेल– उरणमधील आगामी सर्व निवडणुका आम्ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून एकत्रित लढू. पनवेल महापालिका भाजपच्या ताब्यातून महाविकास आघाडीकडे घेण्याचा ठाम निर्धार केलेला आहे. लवकरच पनवेलमध्ये मोठ्या संख्येने पक्षमेळाव्याचे आयोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी प्रवेशकर्त्यांना दिल्या. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, नवी मुंबई निरीक्षक प्रशांत पाटील, महाराष्ट्र प्रदेश सचिव सूरदास गोवारी, पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष नगरसेवक सतीश पाटील, पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस कमिटी कार्यकारी जिल्हा अध्यक्ष शिवदास कांबळे, नगरसेवक विजय खानावकर, विजय मयेकर, पनवेल विधानसभा अध्यक्ष दर्शन ठाकूर यांच्यासह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## रायगड जिल्हा कार्यकारणी समिती जाहीर

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख अलिबाग, सचिन इंगळी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुनिल जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रमोद गवई, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) श्रीमती स्नेहा उबाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक, प्रांताधिकारी डॉ.यशवंत माने, अमित शेगडे, प्रशांत ढगे, राहुल मुंडके, विठ्ठल इनामदार, तहसिलदार सचिन शेजाळ, विशाल दौंडकर, विजय तळेकर, मुख्याधिकारी कर्जत पंकज पाटील, पेण नगर परिषद मुख्याधिकारी जीवन पाटील, अलिबाग मुख्याधिकारी श्रीमती अंगाई साळुंखे, उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र राम राठोड,

कार्यकारणी सदस्य– जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, स्वच्छता व पाणी पुरवठा विभाग, जि.प.रायगड डॉ.ज्ञानदा फणसे, जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी लक्ष्मण खुरकुटे, उपअधीक्षक भूमी अभिलेख अलिबाग प्रदीप जगताप, उपअधीक्षक भूमी अभिलेख पनवेल विजय भालेराव, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सुरेश देवकर, गटविकास अधिकारी पनवेल संजय भोईर, सहाय्यक उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र बालाजी बी.चव्हाण, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन श्री.शेख, पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ.विष्णू काळे, सहजिल्हा निबंधक शैलेंद्र साटम, सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय सुरेश भारती, सहाय्यक पशुसंवर्धन अधिकारी डॉ.विष्णू काळे, तहसिलदार सतीश कदम, सुरेश काशिद, विक्रम देशमुख, भाऊसाहेब अंधारे, दिलीप रायण्णावार, सचिन गोसावी, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, अरुण पवार, गटविकास अधिकारी संजय भोईर.

# उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे–

शुक्रवार दि.२६ नोव्हेंबर २०२१ रोजी दुपारी १.०० वा. रत्नागिरी विमानतळ येथून हेलिकॉप्टरने शासकीय विश्रामगृह, माणगाव येथील हेलिपॅड, ता.माणगाव, जि.रायगडकडे प्रयाण. दुपारी १.४५ वा. हेलिकॉप्टरने शासकीय विश्रामगृह, माण–गाव येथील हेलिपॅड, ता.माणगाव, येथे आगमन व लोणेरेकडे प्रयाण. दुपारी २.०० वा. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ: डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे. सायं. ४.०० वा. श्री.राजीव साबळे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. स्थळ: भादाव, ता.माणगाव. सायं. ४.३० वा. शासकीय विश्रामगृह, माणगाव येथील हेलिपॅड येथून हेलिकॉप्टरने जुहू विमानतळ हेलिपॅड, मुंबईकडे प्रयाण.

# मागेल त्याला शेततळे शेतकऱ्यांना संजीवनी देणारी योजना

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यात काही वर्षांपासून पावसाचे प्रमाण निश्चित झाले आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या कोरडवाहू क्षेत्रातील पिकांवर व त्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. पावसात पडलेला खंड व पाण्याच्या टंचाईमुळे पिकाचे नुकसान होऊ नये, यासाठी मागेल त्याला शेततळे योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे. शेती उत्पादनामध्ये शाश्वतता आणण्यासाठी तसेच दुष्काळावर मात करण्यासाठी शेततळे उपयुक्त असल्याने पर्जन्यावर आधारित शेतीसाठी जलसंवर्धन करून जलसिंचनाची उपलब्धता वाढविणे तसेच संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. रायगड जिल्ह्यात सन २०१७–१८ ते २०२०–२१ या कालावधीत एकूण ६४८ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली असून सन २०१७–१८ मध्ये रु.१०२.२५ लाख, सन २०१८–१९ मध्ये रु.८९.३७ लाख, सन–२०१९–२० मध्ये ५९.६९ लाख, सन २०२०–२१ मध्ये १५.५० लाख व सन २०२१–२२ मध्ये ३३.४१ लाख याप्रमाणे एकूण ३००.२२ लाख अनुदान वाटप करण्यात आले आहे. या शेततळ्यांमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी, मत्स्योत्पादन व पशुसंवर्धन इत्यादी शेती पूरक उद्योगासाठी फायदा झाला असून उत्पादनात काही प्रमाणात शाश्वतता आली आहे. रायगड जिल्ह्यात शेततळे निर्माण केल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्नात वाढ होऊन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. त्यामुळे शेततळे ही योजना शेतकऱ्यांस संजीवनी देणारी योजना ठरली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकास या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, श्रीमती. रेणुका नामदेव खैरे राहणार : उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबावीस टक्के योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. त्याप्रमाणे वर नमूद शेतकरी यांनी माझे अशिल श्री.प्रकाश शाळीक म्हात्रे राहणार : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड खाली वर्णन केलेला भूखंड वर नमूद शेतकऱ्याकडून त्रिपक्षीय करारनामा/हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

**सिडको फाईल क्रमांक** ULV-ICIG-206

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २४ | ५७ | ५०.०० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई–४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

अर्जदार तर्फे वकील : अनंत देवजी पाटील

### जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम नं.२७९/२०१५
नि.नं.२३/ड
ने.ता.०४/१२/२०२१

जनार्दन कृष्णा भोईर वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
१) पुष्पा सुरेश रसाळ
२) इफ्को टोकियो जनरल इश्युरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं.१
पुष्पा सुरेश रसाळ
रा.मु.सोनु अपार्टमेंट, बी विंग, रुम नं.०१,
कामथा, ता.उरण, जि.रायगड

दि.२४/०३/२०१६ रोजी दुपारी ०२:०० वाजण्याच्या सुमारास मौजे : खालापूर येथील जुनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर, खालापूर ते सावरोली रोडवर, खालापूर पोलीस ठाणे, ता.खालापूर, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ यांचा मुलगा सचिन मनोहर गायकवाड हा मयत झालेला आहे. सदर अपघातामध्ये ट्रक क्र.एम.एच.४६/एफ.६७७ वरील चालक त्याच्या मरणास कारणीभूत ठरला आहे.

म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता रु.२,००,०००/– चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.०४/१२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज तारीख २०/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **जिल्हा न्याया.रायगड–अलिबाग** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **जिल्हा न्याया.रायगड–अलिबाग**

# चिंध्रण ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिवसेनेचे शंकर देशेकर यांची निवड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

युवासेना वावंजे विभाग चिटणीस शंकर चाहू देशेकर ह्यांची चिंध्रण ग्रामपंचायतमध्ये उपसरपंच पदी निवड झाल्याचे जाहीर होताच शिवसैनिकांनी उत्साह व्यक्त केला.

यावेळी रायगड उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, मा. रा.जि.प. सदस्य एकनाथ देशेकर, भाजपा कोषाध्यक्ष शिवाजीराव दुर्गे, उपजिल्हा संघटक परेश पाटील, विश्वास पेटकर, उपतालुकाप्रमुख शांताराम कुंभारकर, विभागप्रमुख दत्ता फडके, विभागप्रमुख प्रमोद पाटील, उपविभागप्रमुख रवी फडके, युवासेना वावंजे विभाग अधिकारी मनोज कुंभारकर, शाखाप्रमुख संतोष गडगे, जगन्नाथ म्हात्रे, रुपेश कुंभारकर व विकास पेटकर ग्रामस्थ होते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : पळस्पे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती वैशाली ओवळेकर, चंद्रकांत पुसाळकर व स्नेहा पुसाळकर यांच्या खुद्द मालकी हक्कातील, सामाईक हिश्यातील व ताबेकब्जात व वहिवाटीतील असून सदरच्या मिळकती आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पळस्पे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मिळकत नंबर | जमिनीचे क्षेत्र | बांधकाम क्षेत्र |
|---|---|---|
| २१७ | ६५० चौ.मी. | १२९६ चौ.फूट म्हणजेच १२०.४५ चौ.मी. |
| २१८ | १५० चौ.मी. | १२२८ चौ.फूट म्हणजेच ११४.१३ चौ.मी. |

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये इतर कोणत्याही त्रयस्थ इसमाचे हक्क, हितसंबंध, बोजा, एम.ओ.यु., साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, कुलअखत्यारपत्र, फरोक्त खत, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, लीज, लीन, विकसनाचा करार अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज केले असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत लेखी कागदोपत्री पुराव्यांसह हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाच्याही, कोणत्याही हरकती वरील पत्यावर दाखल न झाल्यास वरील मिळकती ह्या निर्वेध व बोजाविरहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतींच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/११/२०२१

**सही/–**
**ॲड.साजिद एम. शेख**
**शॉप नं.४, समीर अपार्टमेंट, वाजी मोहल्ला, पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मो.नं.८४५०९२४९३४**

ॲड.दर्शना कडू

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात
किरकोळ चौकशी अर्ज क्र.१६८/२०२१

कै.बळीराम केशव भोईर — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक
ग्रामपंचायत नवीन शेवा — सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.केशव मुंडा भोईर ह्यांचा मृत्यू दि.०२/०१/२०२० रोजी मु.नवीन शेवा, ता.उरण, जि.रायगड येथे झालेला आहे.

अर्जदार यांचे वडील कै.केशव मुंडा भोईर ह्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत नवीन शेवा येथील जन्म–मृत्यू रजिस्टरमध्ये करण्याचे नजरचुकीने राहून गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास ग्रामपंचायत नवीन शेवा यांचेकडून मृत्यूचा दाखला मिळालेला नाही. त्यामुळे अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे.न्यायालयात दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जास कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मा.न्यायालयात दि.५/१/२०२२ पर्यंत हजर राहून आपल्या हरकती घ्यावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर सदर अर्जास कोणाचीही कसलीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

अर्जदारतर्फे वकील : आरती वैभव भोईर

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२०३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०१/२०२२

श्री.जयवंत बाबू भोईर
वय : ५६ वर्षे, धंदा :
रा.घर नं.१८९३, कोटनाका, बाळईरोड,
उरण, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.शकुंतला बाबू भोईर ही दि.२०/०७/२०१८ रोजी मौजे : काळाधोंडा, उरण, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाली आहे. त्याअर्थी अर्जदार यांनी ते कै.शकुंतला बाबू भोईर, यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.शकुंतला बाबू भोईर, यांच्या सामाईक मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे : काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड येथील**

| मौजे / गाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| काळाधोंडा | ९८ | ५४/६ | ०–२२–१ पो.ख. ०–००–८ | ३.६८ |
| काळाधोंडा | ९८ | ७२/२ | ०–३७–८ पो.ख. ०–०१–० | ४.५१ |

वरील अर्जदार हे मयत कै.शकुंतला बाबू भोईर यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.शकुंतला बाबू भोईर, यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२३/११/२०२१ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** | कोर्टाचा शिक्का | **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पनवेल शहरातून युवक बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील कोळीवाडा येथून एक युवक बेपत्ता झाला आहे.



सदर युवकाचे नाव वाशीब बशीर शेख (वय २६ रा.४०७ चौथा माळा कोळीवाडा अभिदीप बिल्डींग उरण नाका पनवेल कोळीवाडा जि.रायगड) असून सदर युवक हा दिनांक २४-११-२०२१ ला कुणालाही काहीही न सांगता सदर ठिकाणाहुन बेपत्ता झाला आहे. सदर बाबतीत त्यांचे वडील बशीर अब्दुल रहेमान शेख पनवेल यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात हरविल्याचे तक्रार केली आहे संबधीत व्यक्ती बद्दल काही माहीती मिळाल्यास त्यांचे वडील मो.नं.९९८७९६४०९९, ८३६९६७४६१७ या क्रमांक वर संपर्क साधावा.

## सारडे गावात विविध विकास कामांचे भूमीपूजन व उदघाटन सोहळा संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

सारडे ग्रामपंचायतीच्या वतीने सारडे गावातील विविध विकास कामांचे भूमीपूजन व उद्घाटन समारंभ शेकाप रायगड जिल्हा चिटणीस व पक्ष प्रतोद अँड.आस्वादशेठ पाटील, उरण पंचायत सभापती समिधाताई म्हात्रे, पक्ष प्रतोद व राजिप सदस्य बाजीराव परदेशी, उपसभापती शुभांगीताई पाटील, माजी सभापती सागर कडु यांच्या शुभहस्ते तर माजी राजिप सदस्य जीवन गावंड, माजी पंचायत सदस्य रमाकांत पाटील, शेकाप युवा नेते निलेश म्हात्रे, शिवसेना कार्यकर्ते मनोज पाटील यांच्या उपस्थितीत पि.डब्ल्यू.डी. रस्ता ते सारडे तलाव पर्यंतचा रस्ता, राजिप शाळा सारडे येथील संरक्षण भींतीच्या कामाचे भूमीपूजन श्रीफळ वाढवुन करण्यात आला.

तसेच रा.जि.प.शाळेच्या सभागृहाचे उद्घाटन आस्वादशेठ पाटील यांच्या शुभहस्ते फीत कापुन व श्रीफळ वाढवुन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत सारडे ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच चंद्रशेखर पाटील, उपसरपंच समीर पाटील, माजी उपसरपंच श्यामकांत पाटील, भारती संकेत पाटील, अपेक्षा संदेश पाटील,ग्रा.सदस्या भगवती अविनाश पाटील, ग्रा.सदस्य भार्गव म्हात्रे, ग्रामसेविका संचिता केणी यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन केले.प्रास्तविक करतांना सरपंचांनी गेल्या चार वर्षात ग्रामपंचायतीच्या मार्फत सारडे गावासाठी केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा मान्यवरांच्या समोर मांडण्यात आला. यावेळी गावातील दिव्यांगाना ५%ग्रामनीधीतुन धनादेशाचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जेष्ठ नागरिक ध.प.पाटील गुरुजी, छ.ल.पाटील गुरुजी, जो.ल.पाटील गुरुजी, ए.डी.पाटील, एच.के.पाटील, अ‍ॅड. हिरामण पाटील, पोलीस पाटील घनःश्याम पाटील, कृषी अधिकारी देशमुख, महिला बचत गटातील महिला व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुत्रसंचालनाची जबाबदारी रोहन पाटील यांनी उत्कृष्टपणे पार पाडली. कार्यक्रमाच्या शेवटी सरपंच चंद्रशेखर पाटील यांनी उपस्थितांचे आभार माणून कार्यक्रमाची सांगता केली.

# जल प्रदूषणाला जबाबदार असणाऱ्या कारखान्यांविरोधात गुन्हे दाखल करणार

## कार्यकारी अभियंत्यांची महाड काँग्रेसच्या शिष्टमंडळाला लेखी ग्वाही

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड औद्योगिक वसाहतीमधील जलप्रदूषणाला जबाबदार असलेल्या कारखानदारांवर गुन्हा दाखल करण्याचे लेखी आश्वासन औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. करंडे यांनी आज कांग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाला सुमारे अडीच तासांच्या वादळी चर्चेनंतर दिले. जलप्रदूषणाला जबाबदर असलेल्या कारखान्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात यावेत, सर्व बाधित गावांना औद्योगिक विकास महामंडळाने पाणी पुरवठा करावा, कारखान्यांना टँकरद्वारे करण्यात येणारा पाणी पुरवठा बंद करण्यात यावा, त्याचप्रमाणे तीन दिवसांत पाणीपुरवठा पूर्ववत सुरु करण्यात यावा या पक्षाच्यावतीने करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या महामंडळाचे कार्यकारी अभियंता करंडे यांनी लेखी स्वरुपात मान्य केल्या आहेत.

कारखान्यांतून सोडण्यात आले सांडपाणी औद्योगिक वसाहतीमधील नाल्यांद्वारे काळ नदीच्या पात्रात मिसळल्याने पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित झाले आहेत. परिणामी, तालुक्यातील अठरा गावांसह महाड शहराचा नवेनगर आणि रोहिदास वाडा हा भाग, त्याचप्रमाणे संपूर्ण औद्योगिक वसाहतीमध्ये पाणीबाणी निर्माण झाली आहे. बाधित गांवामध्ये तर अक्षरशः हाहाकार उडाला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने, हनुमंत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि काँग्रेसचे जिलहा सरचिटणीस धनंजय देशमुख आणि तालुकाध्यक्ष राजेंद्र कोरपे यांच्या नेतृत्वाखाली एमआयडीसी कार्यालयावर धडक देते, कार्यकारी अभियंता श्री.करंडे यांच्याशी चर्चा केली. यावेळेस श्री.करंडे यांच्या समवेत प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रदेशिक अधिकारी इंदिरा गायकवाड, एमआयडीसी पाणीपुरवठा विभागाचे श्री.तिडके आणि श्री. कवडगे, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री.खाडे यावेळेस उपस्थित होते.

धनंजय देशमुख यांनी मागण्यांचे निवेदन दिल्यानंतर, प्रत्येक मागणीवर समाधानकारक निर्णय होईपर्यंत आम्ही येथून हलणार नाही असे स्पष्ट केले. त्यानंतर प्रत्येक मुद्यावर सविस्तर चर्चा करण्यात आल.

चर्चे दरम्यान करंडे आणि श्रीमती गायकवाड यांना कार्यकर्त्यांच्या रोषाला आणि आरोपांनाही समोरे जावे लागले.

नांगलवाडी येथील सावित्री नदीवरील जॅकवेलचे पाणी, रसायने मिसळयामुळे दुषित झाल्याने तेथून पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा बंद करण्यात आला आहे. पर्यायी व्यवस्था म्हणून भोराव येथील जॅकवेलमधून तात्पुरत्या स्वरुपात पंप लावून तेथून शनिवारपर्यंत पाणी पुरवठा सुरु करण्यात येईल. सध्या तात्पुरत्या स्वरुपात टँकरद्वारे सर्व बाधित गावांना पाणीपुरवठा करण्यात येईल. जलप्रदूषणाला जबाबदार असलेल्या कारखानदारांविरुध्द प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि औद्योगिक विकास महामंडळातर्फे गुन्हे दाखल करण्यात येतील. टँकर्सचा तुटवडा असल्याने औद्योगिक वापरासाठी टँकरद्वारे होणारा पाणी पुरवठा बंद करण्याचा त्याचप्रमाणे ते टँकर गावागावातील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील अशी लेखी हमी श्री.कारंडे यांनी दिली.

कारखान्यांचे टँकर बंद करण्यासाठी महाड तहसिलदारांना तर दोषी कारखानदरांविरुध्द गुन्हा दाखल करण्यासाठी प्रदूषण नियत्रंण मंडळाला सूचना देण्यात आल्या आहेत. पक्षाच्यावतीने धनंजय देशमुख, राजेंद्र कोरपे यांच्यासह राजेवाडीच्या सरपंच सुरेखा सावंत, सचिन इंदुलकर, विनोद भोसले, अश्रफ कापडी, सुधीर शिंदे, अविनाश भालेकर, सचिन बागडे, गंगाराम भालेकर, अमीर काझी, अनिल अजगरे, मनोहर शिंदे, यांच्यासह बाधित गावांतील कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे यावेळेस पहावयास मिळाले.

## रा.जि.प.शाळा चरई गौळवाडी आदिवासीवाडी शाळेत दप्तर किट वाटप

**दै.रायगड नगरी । तळा**

आज दि.२५/११/२०२१ रोजी रा.जि. प.शाळा.चरई गौळवाडी आदिवासीवाडी. शाळेत CACR foundation आणि हरित ग्राम संस्था महाड यांच्या माध्यमातून लाड सर यांच्या सहकार्याने दप्तर किटच वाटप झाले. तसेच बुद्धीला चालना देणारे खेळणी किट साहित्य व शालेय साहित्य आहे.



या कार्यक्रमा निमित्त अभिनव ज्ञान मंदिर उसर हायस्कूलचे मुख्या. दुधाळ सर, सुर्वे सर, भगत सर जिल्हा आदर्श पुरस्कार प्राप्त मनोज सुतार सर तसेच ज्यांच्या प्रयत्नांनी आम्हाला अनमोल मदत आली असे लाड सर शाळेच्या मुख्या.श्रीम. कल्याणी वाजे, सहशिक्षक ढोले सर, अंगणवाडी ताई पवार मॅडम शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय हिलम गावचे अध्यक्ष गणपत कोळी व सर्व पालक वर्ग उपस्थित होते. शाळेच्या मुख्या व शिक्षक सर्व पालक वर्गाकडून लाड सरांना धन्यवाद व्यक्त केले.

## महाड आगारातून तीन एस.टी. फेऱ्या रवाना

**दै.रायगड नगरी । महाड**

सहा चालक वाहकांसह अन्य २३ संपकरी कर्मचारी आज कामावर हजर झाल्याने तीन मार्गावर एस.टी. फेऱ्या सोडण्यात आल्याची माहिती महाड आगारातून देण्यात आली.

एस.टी. कर्मचाऱ्यांना पगारवाढ देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्यानंतर या कर्मचार्यांनी कामावर हजर होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आज महाड येथून माणगांव , फाळकेवाडी आणि गोरेगाव या तीन मार्गांवर एस.टी. बसेस रवाना करण्यात आल्या.

या फेऱ्यांना प्रतिसाद मिळाला नसला तरी एस .टी. सुरु झाल्याची माहिती प्रवाशांना मिळेल आणि प्रवासी पुन्हा एस.टी. कडे वळतील असे आगाराकडून सांगण्यात आले.

## खारघर रेल्वे स्थानकातील रिक्षा स्टँडला अनधिकृत वाहन पार्कींगचा विळखा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर रेल्वे स्टेशनवर 'सिडको'ने रिक्षा वाहनतळासाठी भूखंड उपलब्ध करुन दिले आहेत. मात्र, सदर भूखंडावर वाढलेले गवत आणि रिक्षा स्टँडच्या जागी दुचाकी वाहने उभी केली जात असल्यामुळे रिक्षा चालक आणि दुचाकी चालकांमध्ये वाद उफाळून येत आहे. 'सिडको'ने दुचाकी वाहन चालकांवर कारवाई करुन रिक्षा स्टँड मधील गवत काढून परिसर स्वच्छ करावा, अशी मागणी 'एकता रिक्षा संघटना'ने सिडको परिवहन विभाग अधीक्षकांकडे पत्राद्वारे केली आहे.

तळोजा आणि खारघर परिसरात जवळपास दोन हजार रिक्षा आहेत. 'सिडको'ने खारघर रेल्वे स्थानकातील प्रवेशद्वारच्या दोन्ही बाजूला रिक्षा वाहनतळसाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. मात्र, या दोन्ही वाहनतळवर मोठ्या प्रमाणात गवत वाढले आहे. 'सिडको'ने दुचाकी आणि चार चाकी वाहनांसाठी खारघर रेल्वे स्थानकाच्या छतावर वाहनतळाची सोय केली आहे. मात्र, दुचाकी चालक रिक्षा वाहनतळाच्या जागेवर वाहने उभी करुन प्रवासासाठी निघून जात असल्यामुळे रिक्षा चालकांना अनेक समस्याना तोंड द्यावे लागत आहे. तर अनेक वेळा वाहने उभी करताना रिक्षा चालक आणि दुचाकी चालकामध्ये दैनंदिन किरकोळ वादाच्या घटना घडत आहेत. त्यामुळे सिडको परिवहन विभागाने दुचाकी वाहन चालकांवर कारवाई करून रिक्षा वाहनतळच्या जागेवर वाढलेले गवत काढून वाहनतळ परिसर स्वच्छ करावा, अशी मागणी 'एकता रिक्षा संघटना'चे उपाध्यक्ष कमलाकर ठावूर यांनी सिडको परिवहन विभाग अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. दरम्यान, खारघर रेल्वे स्थानकातील वाहनतळावरील गवत काढले जाईल. तसेच वाहनतळावर अनधिकृतपणे दुचाकी पार्क करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्याची सूचना खारघर वाहतूक विभागाला करण्यात येईल, असे सिडको अधिकाऱ्यांनी सांगितले.




श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदार यांचे वकील
अ‍ॅड.रजनी गोवारी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश साहेब (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४६९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२१

१) देवेंद्र रमेश वर्मा
उ.व.५७, धंदा : नोकरी
२) विशाखा देवेंद्र वर्मा
उ.व.३१, धंदा : शिक्षण
३) अलोक देवेंद्र वर्मा
उ.व.२८, धंदा : शिक्षण
सर्व रा.फ्लॅट नं.बी १४, टोपीवाला हौसिंग सोसायटी,
मोतीलाल नगर, गोरेगाव वेस्ट, मुंबई ४००१०४ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै.स्मिता देवेंद्र वर्मा यांचे दि.१९/०२/२०१८ रोजी सुचक हॉस्पिटल, मुंबई येथे निधन झाले आहे. यांचे मालकीचे व ताबेकब्जातील खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**
**फ्लॅट नं.१०२, पहिला मजला, प्रजापती लॉन्स**
**सिएचएस, प्लॉट नं.०७, सेक्टर-०६, खारघर,**
**ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१०**

वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही कै.स्मिता देवेंद्र वर्मा यांचे मालकीची व ताबेकब्जातील आहेत. कै.स्मिता देवेंद्र वर्मा यांचे नावे असलेली मिळकत ही अर्जदार यांचे नावे होण्यासाठी अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. कै.स्मिता देवेंद्र वर्मा यांना अर्जदार हेच सदर मिळकतीसंदर्भात कायदेशीर वारस आहेत. त्यांचे या हक्काबाबत कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप दाखल कराव्यात. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये योग्यरितीने हरकती न घेतल्यास हे मा.न्यायालय १) देवेंद्र रमेश वर्मा, २) विशाखा देवेंद्र वर्मा, ३) अलोक देवेंद्र वर्मा हे कै.स्मिता देवेंद्र वर्मा यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा दाखला सदर मिळकतीसंदर्भात देईल, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२३/११/२०२१ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



श्री.भाकरे सो.कोर्ट

अ‍ॅड.रेखा होवाळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्याया.क.स्तर यांचे समोर
वारसाचे सर्टीफिकेट मिळणेबाबत अर्ज
अर्जदार नं.१७२१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०१/२०२२

१) श्री.संतोष हिरामण उरणकर
वय : ५२, रा.अगरवाल कॉम्प्लेक्स, पनवेल
२) सौ.वसुधा रमाकांत ननावरे
रा.यश प्लाझा, आदर्श हॉटेलच्या बाजूला
गडकरी चौक, पनवेल
३) सुनंदा हिरामण उरणकर
४) वासंती अरुण गोरेगांवकर
५) छाया संदीप शेलार
रा.ए विंग, सिद्धार्थ मार्केट, दुसरा मजला,
नवी मुंबई, पनवेल अर्जदार

ज्यापेक्षा कै.अनुसया हिरामण उरणकर ह्यांचा मृत्यू दि.०३/०८/२०१८ रोजी पनवेल येथे झाला. तसेच त्यांचे पती श्री.हिरामण उरणकर यांचा सुद्धा दि.११/०९/२००१ रोजी मृत्यू झाला आहे आणि अर्जदार हे कै. अनुसया हिरामण उरणकर यांची मुले व मुली आहेत. त्यांचे वारसाने मयताचे मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दाखल केला.

**मिळकतीचे वर्णन**
**मिळकत धारकाचे नाव : कै.अनुसया हिरामण उरणकर**
1) Mauje Pale-Karanjade, Taluka Panvel, Dist-Raigad (1/6 th Share)
2) Panvel, Taluka Panvel, Dist-Raigad (1/6 th Share)

| S.No. | H.No. | Area |
|---|---|---|
| 6 | 1) A2/1<br>2) 1A/1/1<br>3) 1/A/1 | 0-48-04<br>0-15-08<br>0-1-08 |
| House No. | 1011 (C) | |
| House No. | 1012 (C) | |

Total Value Rs.1,50,000/- (Rupees One Lakh fifty thousand only)

सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखी नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू कै.अनुसया हिरामण उरणकर यांचे मुजरात वारसाचे सर्टीफिकेट देईल.

तारीख २५ माहे ११ सन २०२१

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारतर्फे वकील
अ‍ॅड.प्रितम शा. वासकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५४१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०१/२०२२

कै.कानूबाई हौसुराम उर्फ हौशाराम गांगरे (मयत) तर्फे वारस
१) श्री.रमेश हौसुराम उर्फ हौशाराम गांगरे
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.लाडकूबाई नागा उर्फ नागेश केणी
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.तरघर, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.यमुना जगन्नाथ पाटील
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.सुविद्या उर्फ विद्या रामकृष्ण महादे
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नांदगांव, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.रेखा महेश पाटील
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धुतूम, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.मालती अरुण पावणेकर
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै. कानूबाई हौसुराम उर्फ हौशाराम गांगरे ह्या दि.१९/०७/२०२१ रोजी मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल येथे मयत झालेले असून श्री.रमेश हौसुराम उर्फ हौशाराम गांगरे... वगैरे हे त्यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीस कायदेशीर वारसदार आहेत.

**कै.कानूबाई हौसुराम उर्फ हौशाराम गांगरे ह्यांचे हिश्श्यास खालीलप्रमाणे जमीन मिळकतीचे आहेत त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| कुंडेवहाळ | १४ | २<br>पो.ख. | ०-०८-९०<br>०-००-५० | १.७५ |
| कुंडेवहाळ | ८२ | ४ अ | ०-०४-० | ०.७८ |

श्री.रमेश हौसुराम उर्फ हौशाराम गांगरे... वगैरे हे कै.कानूबाई हौसुराम उर्फ हौशाराम गांगरे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात. जर ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट श्री.रमेश हौसुराम उर्फ हौशाराम गांगरे... वगैरे ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेणेची कार्यवाही करेल व ते जर कै.कानूबाई हौसुराम उर्फ हौशाराम गांगरे यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२५/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे मॅडम

प्रोसेस जमा रु.५०/- अर्जदारातर्फे वकील : अ‍ॅड.प्रसाद वाकडीकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ/कनिष्ठ स्तर) साहेब यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५१९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१६/१२/२०२१

कै.गुलाब भगवान पाटील (मयत)
१) श्री.प्रवीण भगवान पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
रा.रुम नं.२०५, संतोषी माता मंदिर,
मु.पो.मंगरुळ, तालुका : अंबरनाथ,
जिल्हा : ठाणे. ४२१३०१
२) सौ.प्रतिभा पप्पु पाटील
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.मंगरुळ, तालुका : अंबरनाथ
जिल्हा : ठाणे. ४२१३०१
३) सौ.सोनाली जगदीश पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.नारिवली, पो.वाकलण,
तालुका : ठाणे, जिल्हा : ठाणे ४००६१२ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.गुलाब भगवान पाटील (मयत) यांचे दि.१८/०८/२०२१ रोजी मु.गोरपे, तालुका : अंबरनाथ, जिल्हा : ठाणे येथे निधन झाले.

कै.गुलाब भगवान पाटील (मयत) यांच्या मृत्यूसमयी त्यांच्या वडिलोपार्जित वारसाहक्कातील व स्वकष्टार्जित मालकीच्या अशा खालील मिळकती होत्या.

**मिळकतींचे वर्णन**

| अ. क्र. | गाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | नावडे ९२+९३ | १०६ | ८ | ०-०४-८ | ०.७५ |
| | | १०७ | २ | ०-१०-० | ०.६२ |
| २ | नावडे १७१ | ८ | ० | ०-२५-५ | ४.१९ |
| ३ | नावडे १७१ | ४९ | ३ अ | ०-३१-० | ५.५० |
| | | २७ | १ | ०-४३-१ | ५.९२ |
| | | २१८ अ | ३ | ०-०४-० | ०.०६ |
| | | ७४ | १ | ०-२१-८ | १.१६ |
| | | २७ | २ | ०-२७-८ | ४.८७ |
| ४ | नावडे १७१/अ | १७१ | ३ | ०-११-६ | १.८७ |
| | | १३ | ४ | ०-०३-० | ०.५६ |
| | | १८७ | ३ | ०-६५-३ | १२.३२ |
| | | १८३ | ० | १-०५-० | ७.६० |
| | | १७८ | ० | ०-६३-८ | ३.२३ |
| ५ | नावडे ११४ | २६१ | ० | १-१८-० | ६.३१ |
| ६ | नावडे ११५ | २१८ अ | २ | ०-७-० | ०.११ |
| | | २२२ | ० | ०-२-० | ०.४ |
| ७ | नावडे १२ | ७४ | १ अ | ०-०३-३ | ०.३२ |
| ८ | नावडे १७१ | २९ | ३ | १-२४-३ | ७.१७ |
| ९ | कळंबोली २८ | ३५ | ५ | ०-१४-० | ०.३७ |
| | | ४४ अ | २ (PT) | ०-२-९ | ०.५ |
| १० | कळंबोली २८/अ | ७२ | १३ | ०-१६-० | ०.६६ |
| ११ | पेंधर ८६ | ६२ | - | १-२३-० | ५.०० |
| १२ | पेंधर ७५ ब | ७४ | ० | १-८९-२ | ११.२९ |
| | | ७५ | ० | २-२७-१ | ८.९४ |
| १३ | पेंधर ७५अ-२५७ | ६९ | ४ | ०-०८-६ | १.१९ |
| | | ७२ | ० | ३-२८-५ | १२.७२ |
| | | ६७ | ४ | ०-१२-४ | २.०० |
| | | ७६ | ० | १-४१-४ | १२.१२ |

मयत कै.गुलाब भगवान पाटील यांच्या पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै. वासुदेव लक्ष्मण पाटील (मयत) यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबित झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर केरल.

सदरची नोटीस आज दि.२५/११/२०२१ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## चित्रकला स्पर्धेत कु. रुजल हातनोलकर हिचे यश

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षा निमित्त तालुका विधी व न्याय सेवा समिती, रोहा यांच्या वतीने आयोजित केलेल्या बेटी बचाओ-बेटी पढाओ या उपक्रमा अंतर्गत शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचेकरीता तालुका पातळीवर चित्रकला स्पर्धा २०२१ ही घेण्यात आली होती. याच स्पर्धेत रोहा तालुका स्तरावर सहभागी झालेली नागोठण्यातील कुंभारआळी भागा-तील मुलगी व येथील होली एंजल्स स्कूलमधील ९ वीची विद्यार्थीनी कु.रुजल रोहिदास हातनोलकर हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे.

जेष्ठ नागरिक सभागृह रोहा येथे नुकत्याच घेण्यात आलेल्या बक्षीस वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते तिला सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. तिच्या या यशाबद्दल नागोठण्याचे माजी सरपंच व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पेण विधानसभा मतदार संघाचे उपाध्यक्ष विलास चौलकर यांनी तिच्या घरी जाऊन तिचे अभिनंदन केले. यावेळी भाजपाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोरभाई म्हात्रे, संतोष चितळकर, संजय सांगळे, रोहिदास हातनोलकर, दिनेश घाग, रोहित चौलकर, आरती हातनोलकर आदी मान्यवर उपस्थित होते. याचबरोबर नागोठण्यातील विविध स्तरावर कु. रुजल हातनोलकर हिचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## जल जीवरक्षक सहकारी संस्थेतर्फे लाईफ गार्डचे प्रशिक्षण

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

जल जीवरक्षक सहकारी संस्थेतर्फे रायगड परिसरात कोलाड विभागात प्रथमच लाईफ गार्ड कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे .

नैसर्गिक आपत्ती , नदी , तलाव व समुद्रात आपला व इतर नागरिकांचा जीव वाचविण्यासाठी तसेच लाईफ गार्ड नोकरीकरिता सदरील कोर्स अत्यावश्यक असून रायगड जिल्ह्यातील युवक / युविकांनी हा कोर्स करणे गरजेचे आहे .

तरी सदरील कोर्सकरिता जलतरण येणे आवश्यक आहे . आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कोर्स घेण्यात येतील. कोर्समध्ये ५०० मीटर फ्री टाइल, २५ मीटर ब्रेस्ट स्टोक, २५ मीटर साईट स्ट्रोक , २ मिनिटे फ्लोटीग, १० फुट खोल मधून ' वीट उचलणे, सी.पी. आर. ( प्रथमोपचार ) या सर्व बाबींचे प्रशिक्षण देण्यात येईल.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# वातावरणातील बदलामुळे मच्छिमारांवर संकट

## मासळीची आवक घटल्याने शेकडो बोटी किनाऱ्यावर नांगरल्या

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : उरण- महाराष्ट्रात सर्वाधिक मच्छिमारांची संख्या असलेल्या उरण तालुक्यातील मच्छिमारांवर सध्या अर्थिक संकट ओढवले आहे. १ ऑगस्टला मच्छिमारी हंगाम सुरू झाल्यापासून सतत खराब हवामान आणि वारंवार येणारी चक्रीवादळे यामुळे समुद्रात मासे अतिशय कमी प्रमाणात मिळत आहे. यामिळणाऱ्या मच्छिच्या विक्रीतून मच्छिमारीसाठी जाणाऱ्या बोटींचा डिझेल आणि इतर खर्च देखिल निघत नसल्याने शेकडो मच्छिमारी बोटी किनाऱ्यावर लागल्या आहेत.



त्यामुळे मच्छिमारांचा हंगाम वाया गेला आहे. त्यामुळे येथिल मच्छिमार मोठ्या अर्थिक संकटात सापडला आहे. परिणामी बाजारात देखिल मासळीचे भाव गगनाला भिडले आहेत. मागिल तीन-चार दिवसांपासून मच्छिविक्रेत्यांच्या टोपल्या रिकाम्या दिसत आहेत. ससून डॉक, कुलाबा,भाऊचा धक्का या ठिकाणी मासळी बाजारात मासळीचा तुटवडा जाणवू लागला आहे.

उरण तालुक्याला मोठा सागरी किनारा लाभला आहे. त्या अनुषंगाने उरण तालुक्यात करंजा, मोरा, दिघोडे, खोपटे, आवरे, गोवठणे, हनुमान कोळीवाडा, घारापुरी समुद्रकिनाऱ्यांच्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात मच्छिमारीचा व्यवसाय केला जातो. एकट्या करंजा गावात सुमारे १हजार १०० यांत्रिक नौका असून हजारो कुटूंबाचा उदर निर्वाह या व्यवसायावर चालतो. मात्र यावर्षी मासेमारीचा हंगाम सुरू झाल्यापासून कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे मच्छिमारीमध्ये अडथळा निर्माण झाला आहे.

त्यामुळे मच्छिमारांना खोल समुद्रातून मच्छिमारी न करताच परतावे लागले आहे. याचा परिणाम त्यांच्या उत्पन्नावर झाला आहे. ट्रॉलर किंवा पर्सोनेट नौकेला मच्छिमारीला जातांना साधारणपणे २ लाख रूपये खर्च येतो. डिझेल, बर्फ, खलाशांची मजूरी आणि त्यांचा जेवण-खाण्याचा खर्च अशा प्रकारचा साधारण खर्च असतो. मात्र मच्छिमारीचा हंगाम सूरू झाल्यापासून मच्छिमारांच्या नौका वादळ आणि खराब हवामान यामुळे अनेक वेळा परत आल्या आहेत.

त्यामुळे त्यांचा झालेला खर्च देखिल निघाला नाही. त्यामुळे सध्या प्रत्येक नौका मालकांवर १० ते १२ लाखाचे कर्ज झाले आहे. त्यातच गेल्या अनेक दिवसांपासून शासनाने या मच्छिमारांना डिझेलचा परतावा देखिल दिला नसल्यामुळे मोठ्या अर्थिक अडचणीत सापडला आहे. मच्छिमार अडचणीत सापडल्यामुळे त्या व्यवसायावर आधारीत खलाशी, मच्छिविक्रेते, टेम्पोचालक, जाळी व साहित्य विक्री करणारांचे व्यवसाय देखिल अडचणीत आले आहेत.

> उरण तालुक्यात मच्छिमारांसाठी लॅण्डींग पॉईंट चांगला असल्यामुळे आणि मुंबईसारखी बाजारपेठ जवळ असल्यामुळे व्यवसाय चांगला फोफावला आहे. मात्र गेल्या वर्षीपासून सतत येणारी वादळे आणि खराब हवामान यामुळे मत्स्य उत्पादनात घट झाली आहे. मासेमारीसाठी येणारा खर्च आणि मिळणारे उत्पन्न यांचा ताळमेळ बसत नाही. नफा सोडून द्या पण खर्च पण निघत नसल्यामुळे मच्छिमारांनी आपल्या बोटी किनाऱ्याला लावल्या आहेत. मच्छिमार सध्या अडचणीत आला आहे. शासनाने त्यालाअर्थिक अडचणीत बाहेर करण्यासाठी अर्थिक मदत करावी.
>
> **भालचंद्र कोळी**
> **चेअरमन, करंजा मच्छिमार सोसायटी**

# अठरा दिवसांनी लालपरी पेणच्या रस्त्यावर धावली

**दै.रायगड नगरी । पेण**

एसटीचे शासनामध्ये विलिनीकरण करा या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी आठ नोव्हेंबर पासून सुरू झालेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या संपात सामील झालेल्या रायगड जिल्ह्यातील संपकरी कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी दुपारपासून टप्प्याटप्प्याने रुजू झाले आहेत. त्यामुळे मागील अठरा दिवसांपासून डेपोमध्येच ब्रेक लागून थांबलेली लालपरी म्हणजेच एसटी आजपासून पुन्हा एकदा पेणच्या रस्त्यावर धावू लागली आहे. आजच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील विविध तालुक्यातील एसटी सुरू केल्या आहेत. त्यामुळे मागील दोन आठवड्यांपासून जे प्रवाशांचे हाल झाले होते आणि अधिकचे पैसे खाजगी वाहनांसाठी मोजावे लागत होते त्या प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आज दुपारपासून रायगड जिल्ह्यातील पेण आ-गारातून पनवेल, नागोठणे, अलिबाग या ठिकाणच्या गाड्या सोडून प्रवाशांना सुखकर प्रवास देण्यास एसटी महामंडळाने पुन्हा एकदा एसटी सेवा सुरू केली. ज्याप्रमाणे बस स्थानकात प्रवासी दिसतात त्याप्रमाणे प्रवासी जेथे जात असतील त्या ठिकाणच्या गाड्या सोडण्यात सुरुवात झाली आहे. आज रायगड जिल्ह्यातील आठ आगारांमधील विविध ठिकाणच्या बसेस सुरू झाल्या असून टप्प्याटप्प्याने जसे जसे कर्मचारी हजर होतील तसेतसे जिल्यातील आठही आगारांमधून बसेस सोडून प्रवाशांना जास्तीत जास्त बसेस उपलब्ध करून देणार असल्याचे विभाग नियंत्रक अनघा बारटक्के यांनी सांगितले



# अष्टविनायक तीर्थक्षेत्र बल्लाळेश्वर मंदिराची व देवस्थान ट्रस्टच्या उपक्रमांची इतंभूत माहिती मिळणार आता एका क्लिकवर



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील पालीतील प्रसिद्ध अष्टविनायक तीर्थक्षेत्र बल्लाळेश्वर मंदिराची व देवस्थान ट्रस्टच्या उपक्रमांची इतंभूत माहिती आता एका क्लिकवर मिळणार आहे. अंगारकी चतुर्थीला प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्रीराम सबनीस यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत वेबसाईटचे अनावरण करण्यात आले. येथील भक्तनिवास क्रमांक १ मध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.

ही वेबसाईट सुयोग वझे यांनी तयार केली आहे. यावेळी मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रा. सुधीर पुराणिक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ऍड. धनंजय धारप म्हणाले की बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत ट्रस्टच्या माध्यमातून असंख्य लोकाभिमुख, जनकल्याणकारी सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत. गरजू लोकांना, रुग्णांना व विद्यार्थ्यांना वस्तू, धान्य, सेवा व आर्थिक स्वरूपात मदत केली जात आहे. कोविडच्या संकटात देखील मदतीचा ओघ कायम सुरू आहे. ही सर्व माहीत या वेबसाईटच्या माध्यमातून दाते व लोकांपर्यंत पोहोचेल तसेच आगामी उपक्रम देखील लोकांना कळतील. असे देखील ऍड: धारप म्हणाले.

या कार्यक्रमास शास्त्रज्ञ श्रीराम सबनीस, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ऍड. धनंजय धारप, उपाध्यक्ष विनय मराठे, विश्वस्त माधव साने, उपेंद्र कानडे, सचिन साठे, राहूल मराठे, प्राचार्या डॉ. अंजली पुराणीक, प्रा. सुधीर पुराणिक आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन धनंजय गद्रे यांनी केले. कार्यक्रमासाठी सौरभ मराठे या तरुणाने मेहनत घेतली.

# रणधुमाळी ; माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी होण्याची शक्यता?

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरान मध्ये हळूहळू निवडणुकीचे वारे वाहू लागले असून प्रमुख पक्षांनी आपापल्या परीने एक एक वार्डात अप्रत्यक्षपणे मतदारांना आकर्षीत करण्यासाठी शिरकाव करण्यास सुरुवात केलेली आहे. २०१६ च्या निवडणुकीत शिवसेनेने एकहाती वर्चस्व प्रस्थापित केले होते. या सत्ताधारी गटाने स्वबळावर सतरा पैकी चौदा जागांवर निर्विवाद बहुमत प्राप्त केले होते. नगरपरिषदेची आगामी निवडणूक फेब्रुवारी महिन्यात अपेक्षित आहे त्यामुळे काहीही करून सत्तेत विराजमान झालेच पाहीजे याच एकमेव अभिलाशेने प्रमुख पक्ष समजले जाणारे राष्ट्रीय काँग्रेस पक्ष,शिवसेना, आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी कंबर कसली असून ज्याप्रमाणे राज्यात ह्या तीन पक्षांनी महाविकास आघाडी बनवून सत्तेत सहभागी झाले आहेत त्याच धर्तीवर कदाचित वरिष्ठांच्या आदेशानुसार अशाप्रकारे महाविकास आघाडी होण्याची शक्यता सुध्दा इथे नाकारता येत नाही. कारण राजकारणात केव्हाही कालानुरूप बदल हे होत असतात आणि याचा थांगपत्ताही मतदारांना नसतो त्यामुळे कार्यकर्त्यांना नाईलाजाने वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करणे हे बंधनकारक असते.



मागील २०१६ च्या निवडणुकीत शिवसेना एकीकडे तर राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे एकमेकांचे कट्टर विरोधक होते. त्यावेळी शिव-सेनेने स्वबळावर निवडणूक लढवली होती तर ह्या दोन्हीही काँग्रेस पक्षांनी आघाडी करून शिवसेनेचा सामना केला होता त्यावेळी काँग्रेसला एकाच जागेवर तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले होते. जनतेसमोर हे तिन्ही पक्ष एकमेकांचे विरोधक आहेत. चार वर्षे शिवसेनेच्या माध्यमातून होणाऱ्या विकास कामांना सहसा कुणीही विरोध दर्शविला नाही परंतु जसजशी निवडणूक जवळ येऊ लागली आहे त्यामुळे केवळ दिखाव्यासाठीच की काय विरोधी पक्षाच्या नेत्यांनी शिवसेनेच्या विरोधात आगपाखड करण्यास सुरुवात केली आहे. आरक्षण जाहीर होताच उरलेल्या दोन महिन्यात आणखीन नवनवीन घडामोडी मतदारांना पाहवयास मिळणार आहेत. राजकीय मंडळी केव्हा मतदारांच्या डोळ्यात धूळ टाकून सत्तेसाठी एकत्रित होतील याचा सुध्दा नेम नाही.

माथेरानच्या आजवरच्या राजकीय इतिहासात जे पक्ष एका निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात लढले होते परस्पर उणिधुनी काढून कुणा एका पक्षाची सत्तेत वर्णी लागली होती तेच पक्ष दुसऱ्या निवडणुकीत हातात हात घालून अन्य पक्षाच्या विरोधात रणशिंग फुंकताना दिसतात हे इथल्या मतदारांना ज्ञात आहे. काही प्रभागातील मतदार हे उमेदवारांना अक्षरशः आर्थिक दृष्टीने कंगाल करीत असतात. त्यांच्या आर्थिक मागण्या प्रचंड असल्याने नाहक पैशाचा अपव्यय होण्यापेक्षा राजकीय हेवेदावे विसरून सत्तेत सहभागी असावे याच कारणास्तव इथेही महाविकास आघाडी होण्याची चिन्हे अप्रत्यक्षपणे दिसू लागली आहेत. ही आघाडी झाल्यास राजकीय पक्षांवरचा विश्वास तर राहणार नाहीच परंतु नगरपरिषदेत हाडाचा विरोधक राहणार नसल्याने मतदारांची या निमित्ताने आर्थिक कोंडी होऊ शकते. यावेळी स्वबळावर तर कोणताही पक्ष निवडणुकीला सामोरे जाणार नसून आघाडीच्या माध्यमातून हे तिन्ही पक्ष सत्तेत सहभागी होणार असल्याचे सुध्दा राजकीय विश्लेषकांमधून बोलले जात आहे.

तर काही महिन्यांपूर्वी शिवसेनेशी फारकत घेऊन भाजपवासी झालेले शिवसेनेचे दहा नगरसेवक सुध्दा पक्षाच्या आदेशानुसार सत्ता स्थापन करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार यात शंकाच नाही. भाजपकडे जिल्ह्यातील आर्थिक पाठबळ भक्कमपणे असल्याने भाजपला अल्प मताधिक्य असलेल्या पक्षांना सोबत घेऊन आपला वरचष्मा दाखव-ावा लागणार आहे. यावेळेस आघाडीला बिनशर्त पाठिंबा दिल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या एखाद्या कार्यकर्त्यांना स्वीकृत सदस्य पद दिले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सार्वजनिक बांधकाम खात्याला मनसेच्या रस्ता रोकोचा दणका

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने नादुरुस्त झालल्या नेरळ-कळंब रस्त्याच्या दुरुस्ती आणि डांबरीकरण या कामाच्या मागणीसाठी आंदोल पुकारले होते. मनसेच्या कार्यकर्त्यांनी साई मंदिर येथे तब्बल दीड तास रस्ता रोखून धरला आणि त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग आली. दरम्यान, मनसेच्या आंदोलनाला मोठे यश आले असून नेरळ-कळंब रस्त्याच्या डांबरीकरण तसेच काँक्रिटीकरण कामाला सुरुवात झाली आहे. मनसेच्या आंदोलनाला स्थानिक रिक्षा चालक संघटना यांनी पाठिंबा रिक्षा वाहतूक बंद करून सहभाग नोंदवला.



आज सकाळी मनसेचे कार्यकर्ते पक्षाचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील आणि तालुका अध्यक्ष महेंद्र निगुडकर यांच्या नेतृत्वाखाली मनसेचे तालुका उपाध्यक्ष यशवंत भवारे, अकबर देशमुख, राजेश विरले, नेरळ शहर अध्यक्ष मिलिंद मिसाळ, कर्जत शहर अध्यक्ष समीर चव्हाण, माथेरान शहर अध्यक्ष संतोष कदम, विधानसभा मतदारसंघाचे सचिव अभिजित पाटील, विभाग अध्यक्ष महेंद्र मोगरे, मंगेश गोमारे, समीर वेहले, विद्यार्थी संघटना तालुका उपाध्यक्ष सतीश कालेकर, आदी कार्यकर्ते यांच्यासह स्थानिक मनसेचे कार्यकर्ते आणि नागरिक यांनी रस्ता रोको सुरु केला. दीड तास साई मंदिर येथे नेरळ- कळंब, नेरळ-कशेळे, नेरळ- पिंपळोली आणि पेशवाई रोड या रस्त्यांची वाहतूक बंद पाडली.

पुण्यावरून सार्वजनिक बांधकाम खात्याचे प्रभारी उपअभियंता अक्षय चौधरी यांना पोलीस निरीक्षक तेंडुलकर यांनी बोलावून घेतले. मात्र नेरळ येथे बारा वाजता पोहचलेले उपअभियंता चौधरी हे रस्ता रोको आंदोलनात यायला घाबरले आणि नेरळ पोलीस ठाण्यात जाऊन बसले. शेवटी पोलीस निरीक्षक तेंडुलकर यांनी मनसेचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांची समजूत काढून आंदोलन थांबवावे आणि पोलीस ठाण्यात जाऊन चर्चा करावी अशी विनंती केली. त्यामुळे जिल्हा अध्यक्ष पाटील यांनी रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात येत असल्याचे सांगत आपल्या मनसेचे कार्यकर्ते पोलीस ठाण्यात पोहचले. तेथे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकारी यांच्या उत्तरांवर मनसेचे कार्यकर्ते पुन्हा आक्रमक झाले. शेवटी आजच रस्त्याच्या डांबरीकरण आणि काँक्रिटीकरण कामाला सुरुवात होत आहे आणि तात्काळ काम सुरु करण्याचे आश्वासन दिले.

# अवकाळी व परतीच्या पावसाने मुक्या जनावरांच्या वैरणीचा प्रश्न ऐरणीवर

## पेंढा भिजल्याने जनावरांच्या चाऱ्याचे हाल ; बळीराजा चिंतातूर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अवकाळी व परतीच्या पावसाने भात पिकाचे नुकसान तर केलेच. मात्र झोडणी व मळणी नंतर शेतात रचलेला पेंढा देखील भिजला आहे. पाली सुधागड सह रायगड जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे गुरांचे वैरण भिजून गेले, पावसात पेंढा भिजल्याने कुजलेला आणि बुरशी आलेला हा पेंढा जनवारांच्या खाण्यायोग्य राहिला नाही. त्यामुळे जनावरांच्या चार्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



मागील आठवड्यात देखील जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली. काही शेतकर्याने पिकविलेला भात सुरक्षित ठिकाणी ठेवला असला तरी गुरा-ढोरांच्या चार्यासाठीचा पेंढा/पेंढ्याच्या गंजी मात्र शेतातच ठेवल्या होत्या. मुसळधार पावसाने शेतात आणि मांडवावर ठेवलेला सर्व पेंढा भिजला. भिजलेला हा पेंढा आता कूजु लागला असुन त्यावर काळी बुरशी येऊ लागली आहे. त्यामुळे हा कुजलेला पेंढा गुरा-ढोरांच्या खाण्यालायक राहिलेला नाही. रानातील हिरवे गवत देखील आता सुकले आहे. अशा परिस्थितीमध्ये दुभत्या जनावरांचा आणि ढोरांना खायला काहीच राहिले नसल्याने काही दिवसांतच जनावरांवर उपासमारीची वेळ येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. गरीब परिस्थितीमुळे पेंढा विकत आणणे देखिल शक्य नाही तसेच सर्वत्रच पाऊस झाल्याने पेंढा उपलब्ध होणे आवश्यक आहे. शिवाय पेंढ्याच्या किंमती देखील वाढू शकतात. त्यामुळे बळीराजा चिंतातुर झाला आहे.